१३ व्या वित्त आयोगाकडून अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी प्राप्त अनुदानाच्या विनियोगासाठी जळगांव (जिल्हा रुग्णालय), गडचिरोली (स्त्री रुग्णालय) व चंद्रपूर (जिल्हा रुग्णालय) या ३ जिल्ह्यातील विशेष नवजात काळजी कक्षांचे (SNCU) वाढीव बांधकाम/ दुरुस्तीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा -०३१८/प्र.क्र.१३१ /आ -७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४००००१.
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

<u>वाचा :-</u>

१) शासन पत्र, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.साआवि-३००/प्र.क्र.१०८/ २०१३ /आ-७, दिनांक १७/०१/२०१५.
२) आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसो/पासूविक/९१२०३-२०६/२०१७, दिनांक ०८/१२/२०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यामध्ये शासकीय रुग्णालयामध्ये नवजात बालकांची काळजी घेऊन त्यांचा मृत्यूदर कमी करण्याची योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. राज्यामध्ये सद्या ३५ विशेष नवजात काळजी कक्षाचे (SNCU) असून त्यामध्ये सुमारे ३५,००० गंभीर आजारग्रस्त बालकांना उपचार देण्यात येतात. त्यामध्ये १२ विशेष नवजात काळजी कक्षामध्ये (SNCU) नवजात अर्भकांचे भरती होण्याचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त आहे. सदर परिस्थितीमध्ये सुधारणा व्हावी यासाठी विशेष नवजात काळजी कक्षाचे (SNCU) वाढीव बांधकाम/ दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१३ व्या वित्त आयोगाकडून अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी प्राप्त अनुदानाच्या विनियोगासाठी जळगांव, गडचिरोली व चंद्रपूर या ३ जिल्ह्यातील विशेष नवजात काळजी कक्षांचे (SNCU) दुरुस्तीसाठी व नुतनीकरणासाठी खालीलप्रमाणे एकूण रु.२६७.५७ लक्ष (रुपये दोन कोटी सदुसष्ट लक्ष सत्तावन्न हजार फक्त) इतक्या निधीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

अ. क्र.	विशेष नवजात काळजी कक्षांचे (SNCU) दुरुस्ती/ नुतनीकरणाची कामांची ठिकाणे	अंदाजित रक्कम
१	जिल्हा रुग्णालय, जळगांव	८२.०४
२	स्त्री रुग्णालय, गडचिरोली	११५.८०
३	जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर	६९.७३
	एकूण	**२६७.५७**

२. उपरोक्त प्रशासकीय मान्यता पुढील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

अ) अंदाजपत्रकांमध्ये नमूद केलेल्या बांधकामांना सक्षम स्तरावर तांत्रिक मान्यता घेऊनच कामे हाती घेण्यात यावीत. आवश्यकता वाटल्यास त्याबाबत संबंधित संस्थेतील अधिकाऱ्यांबरोबर सल्ला मसलत करण्यात यावी.

ब) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय, क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र. १७७/तां.क. १, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गशर्क तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

क)सदर प्रस्तावावरील खर्च मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने मान्यता दिलेल्या खर्चापेक्षा अधिक होणार नाही याची आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

ड) उपरोक्त अनुक्रमांक अ ते क येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व बांधकाम नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३१२११४०८५२१७ असा आहे. हा शासन निर्णय आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol
Nilakanth
Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: CN = Amol Nilakanth Sakharkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department
Date: 2018.04.04 14:55:48 +05'30'

(अ. नि. साखरकर)
अवर सचिव

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई
५) निवडनस्ती (आरोग्य-७)